या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार ३० जून २०२४ | अंक२०३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# टीम इंडियाने ११ वर्षानंतर जिंकली आयसीसी वर्ल्डकप ट्रॉफी, कोच राहुल द्रविडला हॅप्पी सेंड ऑफ



## फायनलमध्ये हार्दिकने दिली मॅचला कलाटणी

रोहितच्या या प्रेमामुळे, या कृतीमुळे हार्दिक इमोशनल झाला असला तरी, तो प्रेमाला पूर्णपणे पात्र होता. अंतिम फेरीत त्याने प्रथम 2 चेंडूत 5 धावा केल्या आणि साऊथ आफ्रिकेची बॅटिंग सुरू असताना नंतर 17 व्या षटकात सामन्याचा रोख पूर्णपणे बदलत कलाटणी दिली. हेनरिक क्लासन हा अतिशय स्फोटक खेळी खेळत होता आणि दक्षिण आफ्रिकेला 24 चेंडूत फक्त 26 धावा हव्या होत्या. मात्र त्यावेळी 17 व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर हार्दिकने क्लॉसेनची विकेट घेत टीम इंडियासाठी पुनरागमन केले आणि त्यानंतर 20 या षटकाच्या पहिल्या चेंडूवर डेव्हिड मिलरची विकेट घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. हार्दिकने 3 षटकात फक्त 20 धावा देत 3 बळी घेतले.



**विशेष /प्रतिनिधी**

17 वर्षांनी टीम इंडियाने प्रत्येक दिग्गज खेळाडू आणि करोडो भारतीय चाहत्यांची प्रतीक्षा संपवली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा 7 धावांनी पराभव करून T20 वर्ल्डकप 2024 चे विजेतपद पटकावले. बार्बाडोसमध्ये खेळल्या गेलेल्या या फायनलमध्ये टीम इंडियाच्या विजयाचे अनेक स्टार्स होते आणि त्यात एक नाव सर्वात खास होते – हार्दिक पांड्या. अखेरच्या षटकात हार्दिकने टीम इंडियाला विजय मिळवून दिला आणि तो स्पर्धेचा हिरो ठरला. या विजयानंतर टीम इंडियाचा प्रत्येक खेळाडू भावूक झाला होता आणि याच इमोशनल मूमेंटमध्ये टीमचा कर्णधार रोहित शर्मानेे असे काही केले की ते पाहून सर्व पुन्हा इमोशनल झाले पण त्यांच्या चेहऱ्यावर एक हसूही आलं.रोहितने हार्दिक केल किस, मारली मिठीटीम इंडियाच्या विजयानंतर मैदानावर तिरंगा अभिमानाने फडकत होता. प्रत्येक खेळाडूच्या हातात देशाचा सुंदर ध्वज होता आणि ते मोकळेपणाने आपल्या भावना, आनंद व्यक्त करत होते. याच वेळी मैदानावर काही खेळाडू टूर्नामेंट ब्रॉडकास्टरशी संवाद साधत होते. त्यावेळी हार्दिक पंड्या हा देखील स्टार स्पोर्ट्सच्या प्रतिनिधीशी बोलत होता. मात्र त्याच इंटरव्ह्यूदरम्यान जे घडलं ते पाहून सगळ्यांचेच डोळे पाणावले. हार्दिकचा इंटरव्ह्यू सुरू असतानाच रोहित शर्मा अचानक मध्ये घुसला आणि त्याने कोणताही संकोच न बाळगता, कोणाचीच पर्वा न करता सरळ हार्दिक पांड्याला घट्ट पकडलं, त्याच्या गालावर किस करून आनंद व्यक्त केला आणि त्याला मिठी मारली.

## दादाने घेतलेल्या 'लाडकी बहिण' योजनेच्या सोनाली येवले यांनी पेढे वाटून केले स्वागत



**पाटोदा (प्रतिनिधी)** महाराष्ट्र सरकारने 'लाडकी बहीण,योजना राबवण्याचे घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" ही योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली असून याकरिता आवश्यक निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे ह्या निर्णयांचा पाटोदा तालुक्यातील अजित दादा पवार कट्टर समर्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सोनाली येवले यांनी अजित दादा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांसाठी लोकप्रिय ठरलेली 'लाडली बहिन' योजना आपल्या महाराष्ट्रात लागू केल्याने महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रूपय मिळणारी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण" योजना लागू केल्याने राज्यातील तमाम महिला वर्गात आनंद व्यक्त होत असून पाटोदा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्या सोनाली येवले यांनी पेढे वाटून या योजनेचे स्वागत केले आहे •••

## परळी बस स्थानकात आत व बाहेर रिक्षा चालकांनी गाठला कळस!

### मेन रोडवर अस्ताव्यस्त पार्किंग, बसस्थानकातून रिक्षात भाडे भरणे चालू पोलीस प्रशासन व परिवहन अधिकारी अंध भूमिकेत!

**परळी/प्रतिनिधी**

परळी शहरात वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते. दुचाकी स्वार हे भरधाव वेगात चालत असतात छोटे छोटे अपघात दररोज बसस्थानका समोर पहावयास मिळत आहेत दुचाकी स्वाराना गंभीर इजा होत असून भांडण तंटा हाणामारी यांचे प्रमाणात वाढ झाली असून या वाहतूक कोंडीला जबाबदार कोण?वाहतूक कोंडी का




होते याचा आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.जनमानसात असा समज असा आहे की रस्ते अरुंद, चौकात पोलिस उभे नसल्यास, वाहन चालकाच्या बेशिस्त वागणुकीने होते,मोठ्या,अवजड,माल-वाहतूक वाहना मुळे,बस,रिक्षा मुळे, फूटपाथ वाढविल्यास, गती रोधकांमुळे, फूटपाथ वरील अतिक्रमणाने बस थांब्यामुळे अडसर , फळा ची गाडे हॉटेल समोरील दुकाना समोरील वाहन पार्किंग मुळे वाहतूक कोंडी होतअसून याकडे पोलीस प्रशासन ठोस भूमिका कधी घेणार आटो चे हप्ते घेत सोयीनुसार, हेतू पुरस्पर आणि अनावधानाने दुर्लक्ष करत आहेत की काय आणि जे सर्वात महत्वाचे आहे वाहतूक कोंडीस धुतरफा पार्किंग काढून घेणे,रोडवरील अतिक्रमण उठवणे, यावर प्रतिबंध कधी होणार परळी शहर पोलीस प्रशासन म्हणजे साप सोडून जमीन बडविणे!जिकडे आर्थिक फायदा तिथं दाखवतात कायदा, अवैध खाजगी वाहनांना मोकळीक देणे म्हणजे वड्याचे तेल वांग्यावर काढणे असे म्हणावं लागेल !

## पिपंळा धायगुडा जिल्हा परिषद शाळा वाऱ्यावर गावकऱ्यांनी केली पाहणी, पालकात संताप

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

पिपंळा धायगुडा जिल्हा परिषद उर्दू शाळेमध्ये आज फक्त तीन शिक्षक उपस्थित दिसून आले. इतर शिक्षक विविध कारणावरून गैरहजर असल्याचे दिसून आल्याने तसेच हजर शिक्षका पैकी शिक्षक मोबाईल वर वर्गाबाहेर बोलताना दिसले पालकात संताप व्यक्त करण्यात येत होता. ग्रा.पं. सदस्य आणि काही प्रतिष्ठीत नागरिकांनी शाळेची पाहणी केल्यानंतर त्यांना हा प्रकार दिसून आला. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने या शाळेकडे लक्ष देऊन शाळेवर न येणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. पिपंळा जि.प. शाळेमध्ये शिक्षकांची संख्या आधीच कमी असताना आहे ते शिक्षक दांड्या मारत असल्याचे दिसून आले. मुलांची संख्या जास्त आहे मात्र मुलांना शिकवण्यासाठी शिक्षक नसल्याने मुलांचे शैक्षणीक नुकसान होऊ लागले. याठिकाणी मराठी आणि उर्दू अशा दोन्ही शाळा आहेत. या शाळेवर आज फक्त तीन शिक्षक हजर असल्याचे दिसून आले. गावतील पालक यांनी शाळेची पाहणी केल्यानंतर त्यांना शाळेवर शिक्षक नसल्याचे दिसून आले. याबाबत शिक्षण विभागाने लक्ष घालून दोषींविरोधात कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## माजलगाव येथे 60 खाटांचे स्त्री रूग्णालयास मंजुरी - आ. प्रकाश सोळंके

**माजलगाव (प्रतिनिधी)** : माजलगाव येथे अनेक वर्षांपासून स्त्री रूग्णालयाची मागणी होती, अखेर ही मागणी मान्य झाली असून लवकरच माजलगाव येथे 60 खाटांचे नव्याने स्त्री रूग्णालय सुरू होईल या संदर्भात माजलगाव शहराची व परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता माजलगाव शहरालगत व परिसरातील महिलांसाठी 60 खाटांचे रूग्णालय सुरू झाल्यास या भागातील स्त्रीयासाठी दररोज डिलेव्हरी, सिर्जर, कुटुंब कल्याण कॅम्प व महिलांच्या इतर आजारांवर या ठिकाणी वेळेच उपचार होतील व 24 तास प्रसृती होणार असून यामुळे या भागातील गरजुवंत महिलांना बीड, अंबाजोगाई येथील रूग्णालयात जाण्याची आवश्यकता पडणार नाही. या मुळे 60 खाटांचे स्त्री रूग्णालयास मंजुरी मिळाल्याबद्दल आ. प्रकाशदादा सोळंके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे व माजलगाव तालुक्यातील नागरिकांनी आ. प्रकाशदादा सोळंके यांचे आभार मानले.

## जि.प.प्रा.शाळा संगम येथे शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

जि प प्रा शा संगम शाळेत आज दि २९ जून २४ रोजी शिक्षक पालक मेळावा नुतन परळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री यादव पल्लेवाड,ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ नागरगोजे ,मुख्याध्यापक अशोक नावंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवर व पालकांचे स्वागत



शाळेच्या वतीने करण्यात आले. प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक नावंदे यांनी करताना बैठकीच्या आयोजना बाबत व विध्यार्थी लाभाच्या योजना बद्दल माहिती सांगितली . केंद्रप्रमुख श्री पल्लेवाड यांनी शाळेच्या विकासासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची आहे असे सांगितले व विध्यार्थी विविध शिष्यवृत्ती योजना बाबतची माहिती सांगून असाक्षर पुरुष,महिलांना साक्षर करण्याची जबाबदारी शाळा मुख्याध्यापक,शिक्षक यांच्यासह कुटुंबातील सदस्य यांनी घेऊन सप्टेंबर अखेर सर्वांना साक्षर करावे असे आवाहन केले. पालकांच्या वतीने ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे यांनी शाळेला सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे व असाक्षरांना वही, पेन व उजळणी पुस्तक वाटप करण्याचा मनोदय व्यक्त करून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर ,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम व बबिता शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

कविता

# पहिला पाऊस

पहिला पाऊस
ग्रीष्माने तप्त अवनिला
आतुरता वर्षा ऋतूची
कोसळणाऱ्या धारांनी
चिंब चिंब भिजण्याची

डोळे आभाळा भिडलेले
नजरेत वेध पावसाचे
कृष्ण शामल मेघांच्या
बरसत्या आगमनाचे

वादळ वाऱ्यांच्या सोबतीने
सौदामिनी लागली हसू
घन ओथंबून आले खाली
जलधारा लागल्या बरसू

थेंब टपोरे गवतावरती
अलगद लागले झुलू
झाडे वेली पाने फुले
वाऱ्यासंगे वेगे डोलू

पहिला पाऊस आला
निसर्गाच्या हिरव्या कुशीत
डोंगर दऱ्या भिजून गेल्या
रानवाटा हसल्या खुशीत

ओलेत्या मातीचा गंध
आसमंती दरवळला
माझ्या मनी माझ्या देही
मोगरा प्रीतीचा फुलला

सौ. वंदना शशिकांत पाटील

# सोयाबीनची उगवण झाल्यानंतर करा या उपाययोजना.शेती अभ्यासक चिंचवडे यांचा सल्ला

सध्या राज्यभरात पेरणीचीकामे वेगाने सुरु आहेत. एकदा पेरणी झाली कि त्यांनतरचे व्यवस्थापन चांगल्याप्रकारे होणे गरजेचे असते. ज्या शेतकऱ्यांच्या सोयाबीन पेरण्या झाल्या असतील त्यांनी पुढील व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. उगवण झाल्यानंतर शेताची व्यवस्थित पाहणी करणे महत्वाचे आहे. पाहणी करताना उगवण चांगली झाली आहे का, कोणत्या किडींचा रोगांचा प्रादुर्भाव झाला तर नाही ना, पाने पिवळी पडली आहेत का या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. उगवण कमी झाली असेल तर तूटाळ लागवड करणे किंवा काही ठिकाणी त्याला सांधून घेणे देखील म्हटलं जात. म्हणजेच उगवण कमी झाल्यामुळे रिकाम्या राहिलेल्या जागेवर आपल्याला बियाणे टोकून द्यायचं आहे. तसेच उगवण एकाच जागी जास्त झाली असेल तर अशा ठिकाणी विरळणी करणे गरजेचे असते. उगवण झाल्यानंतर लगेचच शेतामध्ये एकरी 15 ते 20 पक्षी थांबे लावायचे. पक्षी थांबे लावल्याने अगदी कमी खर्चात नैसर्गिक पद्धतीने किडींचे नियंत्रण होते. यासोबतच त्याच काठीवर पिवळे निळे चिकट सापळे देखील लावता येतात. त्यामुळे रसशोषक किडींचे नियंत्रण चांगल्याप्रकारे करता येते. पहिली फवारणी सोयाबीन पेरणी झाल्या नंतर लगेचच 5 ते 6 दिवसांनी खोड माशी व इतर किडींच्या व्यवस्थापनासाठी करावी. 5 % निंबोळी अर्क अथवा अझाडीरेक्टीन 10000 पीपीएम 1 मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यांनतर पुढच्या 10 ते 15

ऑरगॅनिक कट्टा
सेंद्रीय शेती, प्रगत शेतकरी.

## पल्लवी चिंचवडे.शेंद्रिय शेती अभ्यासक

दिवसांनतरचा डोस अन्नद्रव्ये व्यवस्थापन आणि किडरोग नियंत्रणासाठी घ्यायचा आहे. त्यासाठी एक एकर क्षेत्रासाठी ह्युमिक असिड द्रावण 10 लि + ट्रायकोडर्मा 10 लि. + जीवामृत 100 लि. + वेस्ट डिकोम्पोसर 10 ली फवार्याच्या सहाय्याने आळवणी करावी. हि आळवणी दर 15 दिवसांनी एकदा करावी. रसशोषक किडींच्या व खोडमाशी व्यवस्थापनासाठी पिवळे चिकट सापळे 30 प्रती एकरी लावावेत. पावसाळ्यात चिकट सापळ्यांचे चिकट निघून जाते त्यामुळे चिकट सापळे बदलत राहावे लागतात किंवा मग चिकट ज्याला ग्लू म्हटलं जात हा ग्लू पिवळ्या निळ्या प्लास्टिकच्या पुठ्यांवर लावून टाकावा. पाने खाणार्या अळीच्या नियंत्रणासाठी एकरी प्रत्येकी 15 स्पोडो व हेलील्युर वापरून कामगंध सापळे सोयाबीनच्या उंचीपेक्षा 1 फुट उंच काठीवर लावावेत. 35 ते 40 दिवसांनी इप्सोम साल्ट 2 ग्रॅम + दशपर्णी अर्क 10 मिली. + सुडोमोनस 10 मिली. + ट्रायकोडर्मा 10 मिली. प्रती 1 लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी. पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव सोयाबीनमध्ये दिसत असल्यास 1 लीटर दुधापासून बनविलेले ताक 2 लीटर+ हिंग 50 ग्रॅम 200 लि पाणी घेऊन दर 15 ते 20 दिवसांनी एक फवारणी करावी. सोयाबीनला फुले लागण्याच्या अवस्थेत फुल्विक असिड द्रावण 10 लि + ट्रायकोडर्मा 10 लि. + जीवामृत 100 लि.+ वेस्ट डिकोम्पोसर 10 लिटर या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. या आळवणी मुळे फुलधारणा सुधारते तसेच फुलगळ थांबते आणि अन्नद्रव्ये व्यवस्थापनहि चांगल्याप्रकारे होते. फवारणी करण्यासाठी 10 मिलीमीटर फुल्विक असिड प्रती लिटर पाणी या प्रमानात घेऊन करावी. बऱ्याच ठिकाणी गोगलगाइंचा प्रादुर्भाव पाहायला मिळतो आणि आणि प्रादुर्भाव एवढा होतो कि एका रात्रीत पूर्ण पिक नष्ट होते. यासाठी शेतामध्ये पिकांची बारकाईने पाहणी करणे अत्यंत महत्वाचे असते. एक दोन गोगलगाई दिसल्या कि लगेच वेचून नष्ट करायच्या आहेत. यासोबतच शेताच्या बांधावर बारदाना पोते गुळाच्या पाण्यात चांगल भिजवून टाकून द्यायचं आहे किंवा मग गवताच्या गंजी वर देखील गुळाचे पाणी टाकावे जेणेकरून त्याच्या खाली गारवा तयार होईल आणि गोगलगाई दिवसभराच्या उन्हामुळे त्या गारव्याखाली येऊन बसतील. एकाच वेळी सर्व गोगलगाई गोळा करून शेताबाहेर नेऊन नष्ट करायच्या आहेत. कारण सेंद्रिय पद्धतीने फवारणी करून गोगलगाईचे नियंत्रण करणे मुश्कील होते. बियाणे उगवून आल्या नंतर जर शेतात अधिक पाणी साचलेले असेल तर ते पाणी मृत सऱ्यांच्या माध्यमातून शेताबाहेर काढून देणे महत्वाचे आहे. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी झेंडू, मोहरी, एरंडी हि पिकं शेताच्या चारही बाजूंनी लावून टाकायची आहेत. अशा पद्धतीने सोयाबीन उगवून आल्यानंतर काळजी घेणे महत्वाचे आहे. सेंद्रिय शेतीमध्ये कीड रोग येऊच नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे महत्वाचे असते.

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेत सहभागी होण्याकरीता महाविद्यालयांनी इच्छुकता नोंदवावी

**बीड/प्रतिनिधी**

,29: नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. त्या धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच, युवक- युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र” ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. त्याचप्रमाणे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी FUTURE SKILL JOB ROLES चा प्राधान्याने विचार व्हावा, अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून 15 ते 45 वयोगटातील युवक- युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून, त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 मधील व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून महाविद्यालयातील युवक युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे, राज्यातील युवक- युवतींना परदेशामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे, कालसुसंगत तंत्रज्ञानाचे कौशल्य प्रशिक्षण महाविद्यालयीन युवक युवतींना प्रदान करून त्यांना रोजगारक्षम करणे, INDUSTRY 4.0 साठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे ही ध्येये या योजनेअंतर्गत साध्य होणे अपेक्षित आहे. तरी इच्छुक शासकिय/ अशासकिय महाविद्यालयांमध्ये “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या कनिष्ठ, वरिष्ठ, पॉलिटेक्नीक, आयटीआय, अभियांत्रीकी, नर्सिंग, बी. एड., फार्मसी,. महाविद्यालयामध्ये “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र” स्थापन करण्यासाठी https://forms.gle/m1UA-JSW42prB8XGy9 या लिंकवर जावून अर्ज करावयाचा आहे. तसेच सदर लिंक वर जाऊन नोंदणी करण्यासाठी व वारंवार अद्ययावत होणा-या माहितीकरीता BeedSkill या फेसबुस पेजला लाईक करावे व अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या 02442-299116 या संपर्क क्रमांकावर व श्री. जयदत्त इंगोले-9822781876 आणि श्री. सुदाम मिसाळ-9850575709 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन श्री. सुशिल उचले, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, बीड यांनी केले आहे.

# पीक विम्या साठी एक रुपयापेक्षा अधिक रक्कम मागणाऱ्या सीएससी केंद्र चालकांची तक्रार करा

**बीड/प्रतिनिधी**

बीड,29: सध्या खरीप हंगामाचा पंतप्रधान पिक विमा योजनेत पिक विमा भरण्याचे काम जिल्ह्यात वेगाने सुरू आहे. पीक विमा नोंदणीत बीड जिल्हा आपणा सर्वांना अग्रेसर ठेवायचा आहे. बौड सारख्या दुष्काळी जिल्ह्यात पीक विम्याचे कवच असणे ही काळाची गरज आहे. शासनाने ही बाब ओळखून शेतकऱ्यांना प्रति अर्ज केवळ एक रुपया नोंदणी शुल्क ठेवले आहे. बहुतांश शेतकरी हे सीएससी केंद्र चालकांच्या मार्फत ऑनलाइन स्वरुपात पीक विम्याची नोंदणी करतात. जर एखादा सीएससी चालक प्रति अर्ज एक रुपयापेक्षा अधिकची रक्कम मागत असेल अथवा घेत असेल तर त्यांच्याबाबत निःसंकोचपणे पणे प्रशासनाकडे तक्रार करावी. शेतकरी बांधव त्यांची तक्रार स्थानिक कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार, जिल्हा व्यवस्थापक सीएससी, विमा कंपनी प्रतिनिधी यापैकी कुणा एका स्तरावर नोंदवू शकतात. तरी याबाबत सर्व शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी. पेरलेल्या पिकापेक्षा अन्य पिकाचा पीक विमा भरला गेल्यास अर्ज रद्द होईल. तेव्हा शेतकरी बांधवांनी पेरणी केलेल्या पिकाचाच पीक विमा भरावा. सीएससी केंद्र चालकांना जिल्हा स्तरीय प्रशिक्षण वर्गात 1रु पेक्षा कोणत्याही सबबीखाली अधिक शुल्क न घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तरीही याद्वारे त्यांना पुनश्च आवाहन करण्यात येते की, त्यांनी शासनाने ठरवून दिलेल्या शुल्का पेक्षा अधिकचे शुल्क घेऊ नये अन्यथा ते सक्त कारवाईस पात्र राहतील. खरीप 2024 या हंगामापासून देशभरात सर्व पीक विमा विषयक तक्रारी साठी एकच टोल फ्री क्रमांक 14447 करांच्या सोयीसाठी ठेवण्यात आला आहे याचीही शेतकरी बांधवांनी नोंद घेऊन सदर सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री अविनाश पाठक जिल्हाधिकारी, बीड हे करत आहेत.

# शिवसेनेतून कुंडलिक खाडे यांची हकालपट्टी,



पक्ष विरोधी कारवाई केल्याचा फटका शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना अखेर बसला आहे. त्याची हक्कालपट्टी करण्यात आल्याचे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी म्हटले आहे. कुंडलिक खांडे आणि शरद पवार गटाचे कार्यकर्ते शिवराज बांगर यांच्यातील संवादाची कथित ऑडीओ क्लीप व्हायरल झाल्यानंतर शिंदे गटाकडून ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. बीडमध्ये भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा मोठा पराभव झाला आहे. महाराष्ट्रात लोकसभेला कमी जागा मिळाल्यानंतर महायुतीत घटक पक्षांमध्ये कोणी काम केले कोणी मदत केली नाही याची झाडाझडती सुरु असून आरोपप्रत्यारोप होत आहेत. त्यात ही कथित ऑडीओ क्लीप व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादी अजित गटाने नेते मंत्री धनंजय मुंडे यांनी टीका केली होती.

# विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढील जीवनाची वाटचाल करावी- प्रा.डॉ. आनंद वाघ

**बीड/प्रतिनिधी**

'राजर्षी शाहू महाराजांची जयंती सणाप्रमाणे साजरी करा' या डॉ. बाबासाहेबांच्या आदेशाला प्रमाण मानून भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखा, बीडच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्यां जयंतीनिमित्त दिनांक २६ जून २०२४ रोज बुधवार या दिवशी जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सकाळी ठीक ९ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मोटर सायकल रॅली काढण्यात आली तिचा समारोप राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्या जवळ झाला. या मोटारसायकल रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणावर समता सैनिक दलाचे सैनिक सहभागी होते. याच दिवशी संध्याकाळी ठीक ६ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, बीड येथील सभागृहामध्ये शाहू महाराजांच्या जीवनावर व्याख्यान आणि इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. डॉ.आनंद वाघ हे प्रमुख व्याख्याते होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. यशवंत कदम सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.आर.एम शिंदे साहेब (समाजकल्याण आयुक्त बीड), मा. महालिंग निकाळजे (भा. बौ. महासभा. जिल्हाध्यक्ष (प), मा. नानाभाऊ हजारे (उपशिक्षणाधिकारी बीड), मा. एस. एम. साळवे (जिल्हा कृषी अधिकारी), मा. अमरसिंह ढाका (भा. बौ. महासभा. कोषाध्यक्ष (प), मा. संघर्ष गोरे (बीड पोलीस) यांची उपस्थिती लाभली. सर्वच उपस्थित मान्यवरांनी शाहू फुले आंबेडकर यांच्या प्रतिमांना दीप धूप पुष्पाने अभिवादन केले. त्यानंतर व्याख्याते कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख उपस्थित मान्यवरांचे भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांना प्रत्येकी सन्मान चिन्ह पिंपळाचे झाड भेट म्हणून देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा, शहर अध्यक्ष एड. केतन गायकवाड यांनी केले. त्यानंतर प्रमुख उपस्थित मान्यवर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी सुद्धा आपले मनोगत मांडले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा डॉ आनंद वाघ यांनी आपल्या प्रबोधनपर व अभ्यासू मार्गदर्शनामध्ये शाहू महाराजांच्या जीवनामध्ये त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये केलेली क्रांती, महिलांसाठी केलेले कायदे, विधवा




पुनर्विवाह कायदा, आरक्षणाविषयीचे कायदे आणि वेदोक्त प्रकरण खूप छान प्रकारे विद्यार्थ्यांच्या भाषेमध्ये मांडले. विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे जीवन चरित्र अवश्य वाचावे आणि "विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचा आदर्श समोर ठेवून पुढील जीवनाची वाटचाल करावी" असा संदेश आपल्या व्याख्यानातून दिला. त्यानंतर बीड शहरामध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि प्रत्येकी दोन पुस्तक देऊन गुणगौरव करन्यात आला. यावेळी ८० गुणवंत विद्यार्थी त्यांच्या पालकांसोबत उपस्थित होते. सर्वच उपस्थित विद्यार्थी पालक आणि श्रोते यांना भारतीय बौद्ध महासभा, शहर शाखेकडून मिठाईचे वाटप करण्यात आले. शेवटी समता सैनिक नितीन मुजमुले यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास आयु बबन वडमारे, आयु देविदास राऊत सर, आयु चक्रे सर, आयु वानखेडे बाबा, आयु.हनुमंत कांबळे,आयु अण्णासाहेब शेळके सर, आयु अंकुश चव्हाण सर, आयु मायकल वाघमारे, आयु दिनकर बोराडे साहेब, आयु अर्जुन जवंजाळ साहेब, आयु भास्करजी सरपते, भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्ष निसर्गंध ताई, गायकवाड ताई, सरपते ताई, मस्के ताई, वासनिक ताई, जाधव ताई,शोभाताई साळवी,ढाका ताई, पारवे ताई, पंडीत ताई, ई.येडे साहेब वारभुवन ई.कांचन गायकवाड मस्के सर विनोद सवाई आदींनी आपली विशेष उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी आयु. संदेश डोळस, ऍड. केतन गायकवाड, आयु. संतोष जोगदंड, आयु. दिपक कांबळे, आयु. गौतम खेमाडे, आयु. तेजेस वडमारे, आयु. अजय बाळशंकर, आयु. सदानंद वाघमारे, आयु. सिध्दांत वडमारे आयु. अमोल वडमारे, आयु. नितीन प्रधान, आयु. संजय सिरसट , आयु. सुयोग ओव्होळ, आयु. रोहन ससाणे, आयु. उमेश डोळस, आयु. किशोर वडमारे आयु. गणेश शिंदे, आयु. सचिन पवार, आयु. राजेश मस्के आयु. राहुल जावळे, आयु. गौतम सोनवणे, आयु. जितु धन्वे, आयु महादेव शिंदे या सर्वांनीच शहर शाखेच्या वतीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुतार सर यांनी केले.

# जि.प.प्रा.शाळा संगम येथे शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न



**परळी वैजनाथ/ प्रतिनिधी**

जि प प्रा शा संगम शाळेत आज दि 29 जून 24 रोजी शिक्षक पालक मेळावा नुतन परळी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री यादव पल्लेवाड,ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ नागरगोजे ,मुख्याध्यापक अशोक नावंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवर व पालकांचे स्वागत शाळेच्या वतीने करण्यात आले.प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक नावंदे यांनी करताना बैठकीच्या आयोजना बाबत व विध्यार्थी लाभाच्या योजना बद्दल माहिती सांगितली . केंद्रप्रमुख श्री पल्लेवाड यांनी शाळेच्या विकासासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची आहे असे सांगितले व विध्यार्थी विविध शिष्यवृत्ती योजना बाबतची माहिती सांगून असाक्षर पुरुष,महिलांना साक्षर करण्याची जबाबदारी शाळा मुख्याध्यापक,शिक्षक यांच्यासह कुटुंबातील सदस्य यांनी घेऊन सप्टेंबर अखेर सर्वांना साक्षर करावे असे आवाहन केले. पालकांच्या वतीने ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे यांनी शाळेला सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे व असाक्षरांना वही, पेन व उजळणी पुस्तक वाटप करण्याचा मनोदय व्यक्त करून शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी पालक मोठया संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर ,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षिका श्रीमती कल्पना बडे मॅडम व बबिता शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# केज नगरपंचायतीचे सत्ताधारी-विरोधक एकत्र असल्यामुळे केज शहरात विकासाचा आभाव

## मील-बाटकर खायेंगे ची प्रथा अविरतपणे सुरूच केजच्या विवीध प्रश्नांवर केज विकास संघर्ष समितीचा रास्ता रोको



**केज/प्रतिनिधी**

केज शहरात केज नगर पंचायत सत्ताधारी, विरोधक तथा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक मूलभूत समस्या ऐन पावसाळ्यात जशास-तश्या कायम आहेत.या समस्या सोडवण्यासाठी समिती टप्याटप्याने वेगवेगळी आंदोलने करत आहे.केज शहरातील मुख्य महामार्गावरील पथदिवे तात्काळ सुरू करावेत,रोजा मोहल्ला रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करा व केज शहरासाठी मंजूर असलेले लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे बांधकाम त्वरित सुरू करा या तीन मागण्यासाठी शुक्रवारी सकाळी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्या नेतृत्वाखाली अर्धा तास रस्ता रोको आंदोलन केले.वरील मागण्यासाठी समितीने यापूर्वीही अनेक आंदोलने केली आहेत.मात्र प्रशासनाच्या आपसातील समन्वया अभावी ही कामे प्रलंबित राहिली असल्याचा समितीने आरोप केला आहे. केज नगरपंचायत प्रशासनच्या दुर्लक्षामुळे अनेक समस्या प्रलंबित आहेत.आंदोलनस्थळी केजचे प्रभारी तहसीलदार व नगरपंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी सचिन देशपांडे यांनी उपस्थित राहून येत्या एक महिन्याच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून पथदिवे सुरू करण्यात येतील तसेच पुढील तीन दिवसात रोजा मोहल्ला रोड चे काम पूर्ण केले जाईल व पुढील पाच दिवसात लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्य गृहाचे काम सुरूकरण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर समितीने आपले आंदोलन मागे घेतले.या आंदोलनात समितीचे समन्वयक हनुमंत भोसले,नासेर मुंडे,शेषराव घोरपडे,संपत वाघमारे, आदेश देशमुख यांच्या सह नागरिक सहभागी झाले झाले होते.कार्यक्रम स्थळी पोलीस उपनिरीक्षक राजेशपाटील यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# वारीचा घोडा चोरला; कुणकुण लागताच आरोपी पळाला

**पैठण/प्रतिनिधी**

संत एकनाथ महाराजांच्या आषाढी वारी दिंडी पालखी सोहळ्यासाठी आणलेला घोडा अज्ञात चोरट्यांनी पैठण शहरातून चोरून नेल्याची घटना बुधवारी रात्री घडली. याबाबत पोलिसांनी व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून आवाहन केल्याचे कळल्याने तो घोडा वडजी येथे गुरुवारी सकाळी सोडून चोरटा पसार झाला. संत एकनाथ महाराजांचा आषाढी वारी दिंडी सोहळा २८ जून रोजी सायंकाळी ६:३० वाजता पैठण येथून पंढरपूरकडे रवाना होईल. या पालखी सोहळ्यामध्ये महेश राजेंद्र सोनवणे यांचा मानाचा घोडा होता. हा घोडा त्यांनी सरकारी दवाखान्यासमोर बांधला होता. बुधवारी मध्यरात्री चोरट्यांनी तो पळविला. गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास महेशसोनवणे हे चारा-पाणी करण्यासाठी गेले असता त्यांना घोडा दिसला नाही. त्यामुळे त्यांनी आजूबाजूला घोड्याचा शोध केला. पण तो सापडला नाही. त्यांनी पोलिसांना ही



माहिती दिली. पोलिस निरीक्षक संजय देशमुख यांनी व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून विविध ग्रुपवर घोड्याचे फोटो टाकून घोडा चोरीला गेल्याची माहिती पोस्ट केली. याच दरम्यान, हा घोडा पाचोडजवळील वडजी गावात एक व्यक्ती घेऊन फिरत होता. तो १० रुपये घेऊन लहान मुलांना घोड्यावरून गावात चक्कर मारत होता. वडजी येथील काही युवकांच्या निदर्शनास पोलिस निरीक्षक देशमुख यांची व्हॉट्सअॅप ग्रुपवरील पोस्ट आल्याने त्यांना संशय आला. त्यानंतर गावातील आबा गोजरे, महेश झरकर, किशोर गोजरे, रवी भांड या युवकांनी याबाबत पोलिसांना पोलिस पाटील विठ्ठल झिने यांच्या माध्यमातून माहिती दिली . घोड्याला दिले मालकाच्या ताब्यात ग्रामस्थांकडून माहिती मिळताच गुरुवारी सकाळी ९ वाजताच पोलिस निरीक्षक देशमुख कर्मचाऱ्यांसह गावात दाखल झाले.याची कुणकुण लागताच घोडा सोडून चोरटा पसार झाला. यावेळी युवकांनी, गावकऱ्यांनी या घोड्याला पकडून पैठण पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर पोलिसांनी घोडा मालक महेश सोनवणे यांच्या ताब्यात दिला.

# लालपरीचे कर्मचारी पुन्हा आंदोलन करणार ?

**अंबाजोगाई/प्रतिनिध**

'या' मागण्यांसाठी उतरणार रस्त्यावर एसटी कर्मचारी पुन्हा एकदा आंदोलनाच्या तयारीत असल्याची बातमी समोर येत आहे. येत्या ९ आणि १० जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर एसटी कर्मचाऱ्यांकडून हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या पावसाळी अधिवेशनादरम्यान एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा राज्य सरकारला इशारा दिला आहे. राज्यातील एसटी कर्मचारी पुन्हा एकदा आंदोलनाच्या तयारीत असल्याची बातमी समोर



येत आहे. येत्या ९ आणि १० जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर एसटी कर्मचाऱ्यांकडून हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावं आणि प्रलंबित महागाई भत्त्याचीही एसटी कर्मचाऱ्यांकडून मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, आजपासूनच राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरू झालं आहे. या पावसाळी अधिवेशनादरम्यान एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा राज्य सरकारला इशारा दिला आहे. कर्मचाऱ्यांना इनडोअर आणि आऊटडोअर मेडिकल कॅशलेश योजना लागू करावी, एसटीचे खासगीकरण बंद करावे, वेळापत्रकातील त्रुटी दूर कराव्यात या विविध मागण्यांसाठी लालपरीचे कर्मचारी रस्त्यावर उतरणार आहेत.

# वेटरचा राग झाला अनावर, सपासप वार हॉटेल चालकावर

**नाशिक/प्रतिनिधी**

नाशिक रोड परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे ,एका हॉटेल चालकावर दिवसाढवळ्या कोयत्याने वार करण्यात आला असून ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे . याबाबत माहिती अशी की, नाशिक रोड येथील मुक्ती धाम येथे हॉटेल मथुरा या हॉटेलचे संचालक नितीन महानंद सचिदेव हे गेल्या दोन महिन्यापासून ही हॉटेल चालवत होते. राजवाडा देवळाली गाव येथे राहणारा डॅनियल उर्फ डॅनी थोरात हा वेटर त्यांच्याकडे काम करत आहे. शुक्रवारी दुपारी नितीन यांनी यास ग्राहकाकडे आणि कामाकडे लक्ष दे असे सांगितले असता त्याचा त्याला राग आल्याने डॅनी याने मालक नितीन सच देव यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. आणि थांब तुला बघून घेतो असा दम देत तिथून निघून गेला. थोड्याच वेळात तो त्याच्या सात साथीदारा सोबत हॉटेल मध्ये घुसून नितिन हा काउंटर वर बसले असता त्यांना काही समजण्याच्या




आत त्या टोळक्याने त्यांच्यावर कोयत्याने सपासप वार केले. नितीन जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागला, त्याच्यामागे हल्लेखोर सुद्धा त्याचा पाठलाग करत होते. नितीन या हल्ल्यात गंभीर जखमी झाला . परिसरातील नागरिकांनी नितीन यांना नाशिक रोड येथील हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे बिटको रुग्णालयात दाखल केले .हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांनी नितीन यांच्यावर उपचार केले असून नितीन सचिदेव यांच्या डोक्याला मोठा मार लागला असून सुमारे 15 टाके पडल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळीत दाखल झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करीत तीन संशयतांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. दरम्यान हल्ला प्रकरणी नाशिक रोड परिसरात कोयता गँग पुन्हा संक्रिय होत असून, पोलिसांनी अशा गुंड प्रवृत्तीच्या समाजकंटक यांच्यावर कठोर कारवाई करून व्यापारी वर्गात असलेली भीती दूर करावी अशी मागणी व्यापारी करीत आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
रविवार ३० जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# रोहित शर्माने टी२० वर्ल्डकप ट्रॉफी उंचावण्यापूर्वी केली मेस्सीची कॉपी, अगदी तशीच घेतली एन्ट्री



टी20 वर्ल्डकप स्पर्धेच्या जेतेपदावर अखेर टीम इंडियाने नाव कोरलं आहे. धाकधूक वाढवणाऱ्या या सामन्यात भारताने विजय मिळवला. 14व्या षटकानंतर हा सामना दक्षिण अफ्रिकेच्या पारड्यात झुकला होता. मात्र तिथून हा सामना भारतीय संघाने खेचून आणला. जवळपास 11 वर्षे टीम इंडिया आयसीसी जेतेपदासाठी कासावीस झाली होती. गेल्या काही वर्षात संधी मिळाली सुद्धा..पण त्या संधीचं सोनं करण्यात अपयश आलं. पण टीम इंडियाची मेहनत मात्र सुरुच होती. त्याला आता कुठे यश मिळालं आहे. टी20 वर्ल्डकप स्पर्धेत एकही सामना न गमवता टीम इंडियाने विजय मिळवला आहे. वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील पराभवानंतर सहा महिन्यातच टीम इंडियाने करून दाखवलं आहे. इतकंच काय तर बीसीसीआयने रोहित शर्मावर विश्वास दाखवला तो त्याने सार्थकी लावला. विजयानंतर प्रत्येक खेळाडू आनंदात न्हाहून निघाला होता. यावेळी रोहित शर्मा वेगळ्याच मूडमध्ये दिसला. जेतेपदाची ट्रॉफी घेताना रोहित शर्माच्या अंगात लियोनल मेस्सीचं भूत संचारलं होतं, असं म्हंटलं वावगं ठरणार आहे. मेस्सीची फुटबॉल कारकीर्दही अशीच काहीशी होती. वर्ल्डकपचं स्वप्न उराशी बाळगून अनेक वर्षे काढली. अखेर शेवटच्या टप्प्यात जेतेपदावर नाव कोरलं. असंच काही रोहित शर्माचं झालं आहे. टी20 फॉर्मेटमधून निवृत्ती घेण्यापूर्वी जेतेपदाचं स्वप्न पूर्ण झालं आहे. म्हणूनच त्याने ट्रॉफी घेण्यासाठी मेस्सीच्या स्टाईलमध्ये एन्ट्री घेतली आणि ट्रॉफी उंचावली. रोहित शर्माची एन्ट्री पाहून खेळाडूंनाही आनंद झाला.

## श्री गजानन विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज व बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल मध्ये निरोप समारंभ संपन्न

**गंगापूर/प्रतिनिधी**

श्री गजानन प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर, श्री गजानन ज्युनिअर कॉलेज, बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गजानन प्राथमिक विद्यामंदिर राजनगाव शाळेतील सहशिक्षिका श्रीमती अश्विनी मुरलीधर सूर्यवंशी यांची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हापूर या ठिकाणी पवित्र पोर्टल मार्फत नियुक्ती झाल्यामुळे शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार व निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ईश्वर जाधव ,संस्थेचे सचिव हरिष जाधव, प्राथमिक मुख्याध्यापिका सुरेखा बस्वदे, माध्यमिक मुख्याध्यापक मण्णाजी




शिनगारे, उपमुख्याध्यापक शहाजी मंगनाळे, प्राथमिक विभाग प्रमुख मनीषा नवथर, माध्यमिक विभाग प्रमुख प्रा संजय तुपे, इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक भाऊसाहेब शिरसाठ, रेखा बिदरकर, यांच्या हस्ते श्रीमती अश्विनी सूर्यवंशी यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला याप्रसंगी शाळेतील सहकारी शिक्षक वर्ग यांनी आपले मनोगत व्यक्त केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संदीप हिंगणकर व आभार प्रदर्शन परमेश्वर गीते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक तारडे, सौरभ लगड ,कल्याण कुलकर्णी, जाधव विशाल, सुनील शिंदे, उल्हास वाघ स्वाती सूर्यवंशी अनुराधा मुळे, उज्वला सवई, गंगासागर बोराडे, संजीवनी चिकाळे, गुलाब मोहिते, छाया वाघदरे, निकिता देशमुख, जयश्री पाटील, दिपक पठारे, पूजा गिरी, जबार पठाण, विनय अवसरमल, विनायक वाघमारे, प्रल्हाद मंगनाळे पूजा ठाकूर, खोतकर ममता ,खोतकर पूजा, विजया पवार, सोनी कुमारी ,अर्चना बर्जे, श्रीकांत जाधव आदीनी परिश्रम घेतले.

## उलवेमध्ये नवीन फौजदारी कायद्या विषयी मार्गदर्शन

**उरण/प्रतिनिधी** शुक्रवार दि १/७/२०२४ पासून देशात नवीन फौजदारी कायदा अस्तित्वात येणार असून या नवीन फौजदारी कायद्याची जनतेला ओळख व्हावी, नवीन कायद्या विषयी जनतेत जनजागृती व्हावी या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत न्हावा शेवा पोलीस ठाणे आणि आम्ही उलवेकर मित्र मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सचिन राजे येरुणकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १/७/२०२४ रोजी पासून जे नवीन कायदे लागू होणार आहेत त्या बद्दल अंजुमन बागवान - वरिष्ठ पोलीस निरीक्षक न्हावा शेवा बंदर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. सिद्धिविनायक गणपती मंदिर सेक्टर १७, उलवे येथे हे मार्गदर्शन शिबीर पार पडले.या शिबिरात नागरिकांना विविध कायद्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांनी नागरिकांना दिली.यावेळी रविशेठ पाटील-संस्थापक अध्यक्ष साई मंदिर वहाळ , सचिन घरत उपसरपंच,राजेंद्र घरत, राकेश घरत-अध्यक्ष सेक्टर ८, विनोद थोरात, संदीप पाटील, निलेश पाटील,रोहन खंडू,साई पैकडे, अंकुश साळवे आदी मान्यवर तसेच समस्त उलवे नोड मधील रहिवाशी आणि विविध सामाजिक संस्था संघटनेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डी परिसरात रस्ता लुटमार करणारे ४ आरोपी १,३५,००० रुपये किंमतीचे मुद्देमालासह जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगरची कारवाई.

**संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी** प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, दिनांक 14/06/24 रोजी फिर्यादी श्री. ज्ञानदेव नारायण सुर्यवंशी रा. कोकणगांव, ता. कर्जत हे त्यांचे टाटा कंपनीचे टेम्पोमध्ये सफरचंद भरुन मिरजगांव ते पाथर्डी असे घेवुन जाताना माणिकदौंडी घाट, ता. पाथर्डी येथे अनोळखी 4 इसम मोटार सायकलवर येवुन फिर्यादीचे टेम्पोवर दगड फेकुन, टेम्पोला मोटार सायकल आडवी लावुन फिर्यादी व त्यांचे मित्रास चाकुचा धाक दाखवुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन खिशातील 22,000/- रुपये किंमतीचे विवो व ओप्पो कंपनीचे 2 मोबाईल फोन बळजबरी चोरुन नेले बाबत. पाथर्डी पो.स्टे.गु.र.नं. 616/2024 भादविक 394, 341, 34 प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. सदर घटना घडल्यानंतर मा. श्री. राकेश ओला साहेब, पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी पोनि/श्री. दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना स्थागुशाचे पथक नेमुन गुन्ह्याचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

नमुद आदेशान्वये पोनि/श्री. दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अंमलदार पोउपनि/मनोहर शेजवळ व अंमलदार रविंद्र कर्डीले, सचिन अडबल, अतुल लोटके, देवेंद्र शेलार, संदीप चव्हाण, संतोष खैरे, फुरकान शेख, बाळासाहेब खेडकर, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, प्रशांत राठोड व अरुण मोरे अशांचे पथक नेमुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आवश्यक सुचना देवुन पथकास रवाना केले.

स्थागुशा पथक गुन्हा दाखल झाल्यापासुन गुन्ह्याचे तांत्रिक विश्लेषण करुन, गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने आरोपींचा शोध घेत असताना दिनांक 27/06/24 रोजी पथकास गुप्तबातमीदारा मार्फत वर नमुद गुन्हा हा आरोपी नामे अक्षय डमाळे रा. शिरसाठ वाडी, ता. पाथर्डी याने त्याचे इतर साथीदारांनी केला असुन ते आता पाथर्डी ते धामणगांव देवी जाणारे रोडवर असलेल्या वनदेव डोंगरामध्ये रस्त्याचे कडेला बसलेले आहेत आता गेल्यास मिळुन येईल अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पथकाने लागलीच बातमीतील नमुद ठिकाणी जावुन खात्री करता पाथर्डी ते धामगांव देवी जाणारे रोडवरअसलेल्या वनदेवी डोंगराचे कडेला रस्त्यालगत एका मोटार सायकल जवळ 4 इसम बसलेले दिसले. त्यावेळी पथकाची खात्री झाल्याने संशयीतांना अटकाव करुन पोलीस पथकाची ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांची नावे 1) अक्षय अशोक डमाळे वय 20, हल्ली रा. शिरसाठवाडी, ता. पाथर्डी मुळ रा. येळी, ता. पाथर्डी 2) रोहित ऊर्फ भैय्या रमेश कराळे वय 22, 3) अभिषेक सिताराम पवार वय 19, दोन्ही रा. धामणगांव, ता. पाथर्डी व 4) विधीसंघर्षीत बालक असे असल्याचे सांगितले. ताब्यात घेतलेल्या इसमांची पंचा समक्ष अंगझडती घेता त्यांचे अंगझडतील 1 ओप्पो, 1 रेडमी, 3 विवो कंपनीचे मोबाईल फोन व 1 शाईन मोटार सायकल मिळुन आली. त्याबाबत विचारपुस करता आरोपींनी त्यांचा साथीदार नामे 5) सुधीर रावसाहेब कराळे (फरार), रा. धामणगांव, ता. पाथर्डी अशांनी मागिल 10 ते 15 दिवसापुर्वी मोटार सायकलवर जावुन माणिकदौंडी घाट, ता. पाथर्डी येथे टेम्पो आडवुन केलेल्या चोरीतील मोबाईल फोन असल्याचे सांगितल्याने आरोपींना ताब्यात घेतले.

ताब्यातील आरोपींकडे अधिक विचारपुस करता त्यांनी पाडळी शिवार, ता. पाथर्डी परिसरात काही दिवसांपुर्वी मोटार सायकल आडवुन इलेक्ट्रीक काटा व रोख रक्कम चोरी केल्याचे सांगितल्याने अहमदनगर जिल्हा गुन्हे अभिलेख पडताळणी करता



पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं. 601/2024 भादविक 394, 341, 34 प्रमाणे गुन्हा दाखल गुन्हा उघडकीस आला आहे. ताब्यातील आरोपींचे अंगझडतील मिळुन आलेला 15,000/- रुपये किंमतीचा 1 ओप्पो, 10,000/- रुपये किंमतीचा 1 रेडमी, 30,000/- रुपये किंमतीचे 3 विवो कंपनीचे मोबाईल फोन व 80,000/- रुपये किंमतीची 1 शाईन मोटार सायकल असा एकुण 1,35,000/- रुपये किंमतीचे मुद्देमालासह ताब्यात घेवुन पाथर्डी पो.स्टे.गु.र.नं. 616/2024 भादविक 394, 341, 34 प्रमाणे दाखल गुन्ह्याचे तपासकामी हजर केले आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस स्टेशन करीत आहे. सदरची कारवाई मा. श्री. राकेश ओला साहेब. पोलीस अधीक्षक, अहमदनगर, मा. श्री. प्रशांत खैरे साहेब, अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर, मा. श्री. सुनिल पाटील साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगांव विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com